नि.फौ.ख.क्र.२५०/२०२१ सरकार वि.चांगदेव व ई.

निशाणी क्रमांक ११

# दोषारोप

मी, एस. आर.कनकदंडे, न्यायदंडाधिकारी, वर्ग–१, (न्यायालय क्र.३) पारनेर, आपणावर दोषारोप ठेवतो की, आपण –

१. चांगदेव काशिनाथ गायकवाड,
**वय** – ६२ वर्ष, **धंदा** –शेती,

२. विकास चांगदेव गायकवाड,
**वय**–२६ वर्षे, **धंदा**–शेती,

३. नंदा चांगदेव गायकवाड,
**वय–**५५ वर्षे, **धंदा–**शेती,

**सर्व रा.** हत्तलखिंडी, ता.पारनेर, जि.अहमदनगर.

यांच्यावर खालीलप्रमाणे दोषारोप निश्चित करत आहे.

१. दिनांक ०३.०३.२०२० रोजी सायंकाळी ०६.०० वाजेच्या सुमारास मौजे हात्तलखिंडी, ता.पारनेर, जि.अहमदनगर येथे आरोपींनी संगनमताने फिर्यादी यास विट मारुन नाकावर, उजवे पायावर दुखापत करुन व काठीने तसेच साक्षीदार यास दगड फेकुन मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली आणि त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे माझे अधिकारक्षेत्रामध्ये गुन्हा केलेला असून त्याचा अभियोग या न्यायालयात चालणार आहे.

२. उपरोक्त नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा साक्षीदार यांना तिची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने विटा फेकुन मारुन दुखापत पोहोचविली आणि त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३३६ सह कलम ३४ प्रमाणे माझे अधिकारक्षेत्रामध्ये गुन्हा केलेला असून त्याचा अभियोग या न्यायालयात चालणार आहे.

३. उपरोक्त नमुद तारीख वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी यास लाथाबुक्याने मारहाण करुन जखमी केले व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता

कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगीरीतील गुन्हा केला.

४. उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संनगमताने सार्वजनिक शांतता बिघडविण्याच्या उद्देशाने वर नमुद फिर्यादी व साक्षीदार यांना प्रोत्साहित करण्यासाठी शिवीगाळ करुन त्याचा अपमान केला व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगीरीतील गुन्हा केला.

५. उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना फौजदारीपात्र धाकदपटशा करुन जिवे मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला आणि या न्यायालयाच्या दखलगीरीतील गुन्हा केला.

आणि मी याद्वारे असा निर्देश देतो की, उक्त दोषारोपांवरुन तुमची या न्यायालयाद्वारे संपरीक्षा करण्यात यावी.

सही/–

**(एस.आर.कनकदंडे)**

दिनांक – २१.०७.२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

पारनेर, जि.अहमदनगर.